महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: itdept@maa.ac.in

---

जा.क्र. राशैसंप्रपम /आय.टी./व.नि प्रशिक्षण दुरुस्ती /२०२२ -२३ / ५२०७ दिनांक : ०२.११.२०२२.

प्रति,
१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
२. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व),
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
५. शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक (सर्व),
६. शिक्षण निरीक्षक, मुंबई, (पश्चिम/दक्षिण/उत्तर),
७. प्रशासन अधिकारी, मनपा/नपा (सर्व).

**विषय :- ऑनलाईन वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण दुरुस्ती प्रक्रियेस मुदतवाढ देणेबाबत…**
**संदर्भ :-**

१. शासन निर्णय क्र. चवेआ-१०८९/१११/माशि-२, दि.२.०९.१९८९
२. शासन निर्णय क्र. शिप्रधो २०१९ /प्र.क्र. ४३/प्रशिक्षण, दि.२०.७.२०२१.
३. शासन परिपत्रक जा. क्र. शिप्रधो २०२१/प्र. क्र.६७/प्रशिक्षण दिनांक ०६.१०.२०२१
४. या कार्यालयाचे प्रशिक्षण आयोजनाचे पत्र जा.क्र.राशैसंप्रपम/आय.टी./व.नि.प्रशिक्षण /२०२२-२३/२२३८ दि.०१.०६.२०२२.
५. या कार्यालयाचे प्रशिक्षण आयोजनाचे पत्र जा.क्र.राशैसंप्रपम/आय.टी./व.नि.प्रशिक्षण /२०२२-२३/२२४५ दि. ०६.०६.२०२२.
६. या कार्यालयाचे प्रशिक्षण आयोजनाचे पत्र जा.क्र. राशैसंप्रपम /आय.टी./व.नि प्रशिक्षण दुरुस्ती /२०२२ -२३ / ४९९८ दिनांक : २०.१०.२०२२ .

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ चे पत्रान्वये राज्यातील एकूण ९४,५४१ नावनोंदणी केलेल्या शिक्षक/ मुख्याध्यापक, प्राचार्य व अध्यापकाचार्य यांचेसाठीचे वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण ऑनलाईन स्वरूपामध्ये सुरु करण्यात आले होते. सदरच्या प्रशिक्षणामध्ये एकूण ९१,१८९ नावनोंदणी केलेल्या प्रशिक्षणार्थी यांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

सद्यस्थितीमध्ये उर्वरित प्रशिक्षणार्थी यांना काही तांत्रिक अडचणीमुळे प्रशिक्षण सुरु करण्यात/ पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. तसेच संदर्भ क्रमांक ५ व ६ अन्वये च्या पत्रानुसार **दिनांक २१.१०.२०२२ ते ३१.१०.२०२२** दरम्यान यापूर्वी देखील प्रशिक्षणार्थी यांना आवश्यक दुरुस्तीची सुविधा या कार्यालयामार्फत उपलब्ध करून

देण्यात आलेली होती. यास एकूण **११९५ प्रशिक्षणार्थी** यांनी प्रतिसाद दिला असून तो अत्यल्प आहे. तथापि अद्यापही काही प्रशिक्षणार्थी यांच्याकडून झालेल्या तांत्रिक चुकांमुळे (चुकीचा ई-मेल आय.डी नोंदणी, चुकीचा प्रशिक्षण प्रकार अथवा प्रशिक्षण गट नोंदणी करणे, लॉगीन तपशील प्राप्त होण्यापूर्वीच प्रशिक्षण सुरु करणे, एकाच ई-मेल आय.डी वरून दोन प्रशिक्षणासाठी नोंदणी करणे) इत्यादीमुळे संबंधित प्रशिक्षणार्थी यांना काही दुरुस्ती करावयाची शिल्लक असल्याने व दुरुस्तीस जास्तीचा प्रतिसाद मिळणेसाठी संबंधित प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण प्रलंबित असल्याने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयामार्फत http://training.scertmaha.ac.in/ या संकेतस्थळावर दुरुस्ती सुविधेस **दिनांक १५.११.२०२२ पर्यत मुदतवाढ** उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरच्या दुरुस्तीच्या सुविधेमार्फत खालील दुरुस्ती प्रशिक्षणार्थी करू शकणार आहेत,

- प्रशिक्षणाचे लॉगीन उपलब्ध झालेले नसणे.
- प्रशिक्षण गट तसेच प्रशिक्षण प्रकार यामध्ये बदल करावयाचा असणे
- ई-मेल आय.डी.दुरुस्ती करणे
- प्रशिक्षण प्रमाणपत्र दुरुस्ती करणे.

**सदरची दुरुस्ती प्रक्रिया ही केवळ ज्या प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण अद्यापही सुरु नाही अशाच प्रशिक्षणार्थी यांचेसाठी आहे याची नोंद घ्यावी, ज्या प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण सुरळीतपपणे सुरु आहे अशा प्रशिक्षणार्थी यांनी कोणत्याही प्रकारची दुरुस्ती अथवा बदल करून नये. तसेच आवश्यक दुरुस्ती केल्यानंतरच्या कार्यवाहीबाबत देखील http://training.scertmaha.ac.in/ या संकेतस्थळावर सविस्तर वेळापत्रक देण्यात आलेले आहे.**

उक्त नमूद दुरुस्ती सुविधा सर्व उर्वरित प्रशिक्षणार्थी यांना दिनांक २१.१०.२०२२ ते १५.११.२०२२ या कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यात येत असून दिनांक १५.११.२०२२ नंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये दुरुस्तीची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार नाही, याबाबत संबंधित प्रशिक्षणार्थी यांना अवगत करावे.

तरी वरीलप्रमाणेच्या प्रशिक्षण दुरुस्ती सुविधेबाबत आपल्या कार्यक्षेत्रामधील प्रशिक्षणार्थी यांना अवगत करण्यात यावे.

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे -३०.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

- मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत, पुणे.

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव

- नाव नोंदणी केलेले परंतु प्रशिक्षण प्रलंबित असणारे प्रशिक्षणार्थी